**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

- आयकॉनिक शहर विकासाच्या धोरणाला राज्यमंत्रिमंडळाची मंजुरी

- नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी दाखल अर्जांची आज छाननी

- प्रधानमंत्री उद्या पीएम किसान सन्मान निधीच्या २१व्या हप्त्याचं वितरण कोईमतूर इथं करणार

आणि

- आंध्रप्रदेशात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली ठार

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आले. नवी दिल्ली इथं आज झालेल्या सोहळ्यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारनं गौरवण्यात आलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या विभागात गुजरातला द्वितीय तर हरियाणाला तृतीय पुरस्कार मिळाला. उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम पुरस्कार पटकावला आहे.

अमृताइतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे, अशी भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केली. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रमाद्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं.

**- - होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

हवामान बदलाचा जलस्त्रोतांवर परिणाम होत असून जलस्त्रोतांच्या संवर्धनसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावं असं आवाहन यावेळी राष्ट्रपतींनी केलं.

या कार्यक्रमात केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील, जलशक्ती राजमंत्री व्ही. सोमन्ना आणि राजभूषण चौधरी उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात दहा विभागांमधे ४६ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**<><><><>**

राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीनं आयकॉनिक शहर विकासाचं धोरण राज्य सरकारनं जाहीर केलं आहे. मुंबईत आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मान्यता मिळाली. सिडकोसह, विविध प्राधिकरणांच्या जमिनी,आणि भूखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्याला या धोरणात प्राधान्य राहील.

बृहन्मुंबई उपनगरातल्या वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावर म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचं धोरणही निश्चित करण्यात आलं आहे. यातून मुंबई शहर आणि उपनगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परवडणारी घरं उपलब्ध होतील.

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती करण्याला आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदं अशी ३३९ पदांची निर्मिती करण्याचा प्रस्ताव बैठकीत मंजूर झाला.

**<><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २५ डिसेंबरपासून कार्यान्वित होत आहे. या विमानतळावरुन २६ डिसेंबरपासून नवी मुंबईहून दिल्ली, गोवा, कोची आणि अहमदाबादसाठी अकासा एअरची नियमित उड्डाणे सुरु होणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ८ ऑक्टोबरला या विमानतळाचं उद्घाटन केलं होतं.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अर्ज मागे घेतील, अशी अपेक्षा, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली. ते आज नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. एका जागेवर फक्त एकाच व्यक्तीला एबी फॉर्म देता येत असल्यामुळे, उर्वरित कार्यकर्त्यांनी निराश न होता पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या प्रचारासाठी काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं. मुंबई महानगरपालिका निवडणुका महायुती एकत्र लढवणार असून,

सरकार स्थापनेसाठी आवश्यक दोन तृतीयांश जागा आणि ५१ टक्के मतं मिळवणं हे ध्येय असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी दाखल अर्जांची छाननी आज होत आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सहा नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीच्या सदस्यपदासाठी एकूण एक हजार ३१० अर्ज दाखल झाले आहेत. जिल्ह्यात अध्यक्षपदासाठी ८९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

**सोलापूर** जिल्ह्यात ११ नगरपरिषदा आणि एका नगरपंचायत निवडणुकांसाठी नगराध्यक्षपदांसाठी १४६ तर २८९ सदस्यपदांसाठी २ हजार २६१ उमेदवारी अर्ज आले.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या सावंतवाडी, वेंगुर्ले आणि मालवण या तीन नगरपरिषदा आणि कणकवली नगरपंचायतीतल्या अध्यक्षपदासाठी ३१ तर सदस्यपदांसाठी ३५९ नामनिर्देशन पत्रं दाखल झाली आहेत.

**रायगड** जिल्ह्यातल्या दहा नगरपालिकांमधल्या एकूण दहा अध्यक्षपदांसाठी ५९ तर २१७ सदस्यपदांसाठी ९०० उमेदवारांनी उमेदवारी अर्ज केले आहेत.

**वाशिम** जिल्ह्यात ४ नगरपरिषदा आणि एक नगरपंचायत यांच्या सदस्यपदांसाठी ८३ तर सदस्यपदांसाठी १ हजार ६३ नामनिर्देशनपत्र दाखल झाली.

**परभणी** जिल्ह्यातल्या सात नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी एकूण ११७ तर नगरसेवक पदासाठी १ हजार २१० उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रं दाखल केली आहेत.

**नांदेड** जिल्ह्यातल्या १२ नगरपरिषदा आणि एक नगरपंचायत यांच्या निवडणुकांमध्ये नगराध्यक्ष पदासाठी २१२ तर सदस्यपदांसाठी २ हजार १५३ उमेदवारी अर्ज आले आहेत.

**वाशीम** जिल्ह्यातल्या नगरपरिषद - नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूकांमध्ये अध्यक्षपदासाठी एकूण ८३ तर सदस्यपदांसाठी १ हजार ६३ नामनिर्देशनपत्र दाखल

**रत्नागिरी** जिल्ह्यातल्या चार नगर परिषदा आणि तीन नगर पंचायतीमध्ये अध्यक्षपदांसाठी एकूण ५६ उमेदवारी तसंच, एकूण १५१ सदस्यपदांसाठी ६३५ अर्ज दाखल झाले आहेत.

**जालना** जिल्हयातल्या भोकरदन परतूर आणि अंबड या नगरपरिषदांतील अध्यक्षपदांसाठी कालपर्यंत एकूण ४२ तर सदस्यपदांसाठी ४१८ उमेदवारी अर्ज आले.

**लातूर** जिल्ह्यातल्या ४ नगर परिषदा आणि एक नगरपंचायत यामध्ये अध्यक्षपदांसाठी १०३ तर सदस्यपदांसाठी १ हजार २५७ जणांचे उमेदवारी अर्ज आले आहेत.

**नंदुरबार** जिल्ह्यातल्या चार नगर परिषदेच्या अध्यक्षपदांसाठी ४९ अर्ज तर नगरसेवकपदांसाठी ७२६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या पीएम किसान सन्मान निधीच्या २१व्या हप्त्याचं वितरण करतील. तमिळनाडूत कोईंबतूर इथं मुख्य कार्यक्रमात प्रधानमंत्री देशातल्या ९ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मिळून १८ हजार कोटी रुपये जमा करतील.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आंध्रप्रदेश आणि तमिळनाडूच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आंध्रप्रदेशात पुट्टपार्थी इथं श्री सत्यसाईबाबांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारं टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन मोदी यांच्या हस्ते होईल.

तमिळनाडूमधे नैसर्गिक शेतीविषयीचं एक चर्चासत्र तिथल्या कृषी उत्पादक मंचानं आयोजित केलं आहे. त्याला प्रधानमंत्री उपस्थित राहतील.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज चौथी अर्थसंकल्पपूर्व बैठक भांडवली बाजारातल्या प्रतिनिधींसोबत घेतली. या बैठकीत अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थ मंत्रालयाचे सचिव आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन उपस्थित होते. अर्थमंत्रालय दरवर्षी अर्थसंकल्पापूर्वी तज्ज्ञ, उद्योगपती, अर्थतज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत असतं. यावर्षीही केंद्रीय अर्थमंत्री विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञ व्यक्तींसोबत बैठका घेत आहेत.

<><><><><>

तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात भारत जगाचं नेतृत्व करेल, असा विश्वास वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी आज व्यक्त केला. नवी दिल्ली इथं फिक्कीच्या ९८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. २०४७ पर्यंत विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी सरकार नवोन्मेष क्षेत्राला चालना देत असल्याचं गोयल यांनी सांगितलं. त्यासाठी नागरिकांमध्ये योग्य कौशल्यं विकसित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

भारताचं प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्र सर्वात वेगानं वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक ठरलं असून २०३० पर्यंत शंभर अब्ज अमेरिकी डॉलरचा टप्पा पार करेल, असा अंदाज आहे. गेल्या दशकभरात या क्षेत्राचं अर्थव्यवस्थेतलं योगदान सातत्यानं वाढत असून मूल्यवर्धन आणि रोजगारनिर्मिती या दोन्ही क्षेत्राचा मोठा हातभार लागत आहे. ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेट रिॲलिटी या क्षेत्रांमुळे देशाच्या सर्जनशील क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे.

<><><><><>

भावी पिढ्यांची अन्नधान्य आणि जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक असल्याचं प्रतिपादन  राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं आहे.  पुण्यात शिवाजीनगर इथं कृषी महाविद्यालयात नैसर्गिक शेती या विषयावर आयोजित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होती. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी आणि इतर मान्यवर  उपस्थित होते.

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी  नैसर्गिक शेतीचं महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावं असं आवाहन राज्यपालांनी केलं.

रासायनिक शेतीमुळे जमिनीचा कस, धान्याचा स्वाद आणि पोषकता कमी झाली असल्याने  नैसर्गिक शेती ही केवळ शेतकऱ्यांसाठी नव्हे, तर प्रत्येकासाठी आवश्यक आहे, असंही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यावेळी  म्हणाले.

<><><><><>

आंध्र प्रदेशात सुरक्षा दलांसोबत आज झालेल्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली मारले गेले. हिडमा याच्यावर एक कोटी रुपयांचं इनाम होतं. अनेक हिंसक कारवायांमधे हिडमाचा सहभाग असल्याचं पोलिसांनी सांगितलं. ठार झालेल्यांमधे हिडमा मडावीची पत्नी राजे हिचाही समावेश आहे. आंध्र प्रदेशामधल्या अल्लुरी सितारामा राजू जिल्ह्यात आज सकाळी सहा ते सातच्या दरम्यान, सुरक्षा दल आणि नक्षलींमधे चकमक झाली. त्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू असल्याचं पोलीस महासंचालक हरिश कुमार गुप्ता यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितलं.

//<><><><><>//